# श्री. लक्ष्मणराव भिवाजी उराडे

सेवक क्र. ८५४ मु. इतवारी, लालगंज, तेलीपूरा, नागपूर

या मार्गावर येण्याचे कारण म्हणजे मला वीस वर्षापासून पोटाचा त्रास होता. तसेच माझ्या मुलाला पुत्रसंतती नव्हती. आम्ही निरनिराळे संत पाहिले आणि त्याचे कार्यपण केले. मी स्वतः ''गुरुदेव सेवा मंडळ'', इतवारी या शाखेचा तीस वर्षापासुन सेवक होतो. परंतु मी अजूनही गुरु केला नव्हता. कारण माझा कुणावरच विश्वास बसत नव्हता. मी अनेक संस्थाचा सभासद असून नागपूर जिल्हा मध्यवर्ती ग्राहक भांडाराचा डायरेक्टरसुध्दा होतो.

एकदा परमात्मा एक सेवक ग्राहक भांडाराला धान्य ठेवण्याकरिता गोडाऊनची आवश्यकता होती म्हणून श्री. नागोरावजी खापरे आणि श्री. पाटील हे गोडाऊन पाहण्याकरिता नागपूर जिल्हा मध्यवर्ती ग्राहक भांडारात आलेत. त्यावेळी मी सेवक नव्हतो. त्यांना दोन-तीने गोदामे दाखविली. परंतु ती पसंत पडली नाहीत. नंतर त्यांना माझे गरोबा मैदानातील गोडाऊन दाखविले. ते त्यांना पसंत पडले. नंतर पुन्हा श्री. खापरे, श्री. पाटील आणि महानत्यागी बाबा जुमदेवजी गोडाऊन पाहण्याकरिता आलेत. सर्वांना गोडाऊन पसंत पडले. नंतर आम्ही चहा घेण्याकरिता समोरच्या दुकानात गेलो. त्याठिकाणी बाबांनी भगवंताची ओळख सांगितली. त्या वेळी मी बाबांना माझे आणि माझ्या कुटुंबातील दुःख मनमोकळेपणाने सांगितले. माझे दुःख असे होते की, मला पोटाचा त्रास वीस वर्षापासून होता. वीस वर्षाअगोदर मी मेडीकलमध्ये भरती झालो होतो. त्यावेळी पोटाचा एक्सरे काढला होता. त्यात असे दिसून आले होते की, आतड्ययाला हृदयाच्या जवळ आणि बेंबीजवळ असे दोन फोड आहेत आणि ते ऑपरेशनशिवाय दुरुस्त होऊ शकत नाही. दुसरे दुःख असे होते की, मुलाला संतती नव्हती. बाबांनी आम्हाला भगवंताबद्दल सर्व माहिती दिली आणि पाळावयाचे तत्त्व, शब्द, नियमाबद्दलही सांगितले. परंतु आजपर्यंत मनात आलेल्या देवांमुळे माझा विश्वास बसत नव्हता. तरीपण आम्ही कुटुंबातील सर्व लोक एकमत करुन बाबांकडे गेलो. बाबांनी आम्हास सात दिवसांची साधी अगरबत्ती दिली. दुसऱ्या दिवसांपासून एका भगवंताला स्मरुन विनंती केली आणि जेवण केले. त्याच दिवशी पोटाचा त्रास कमी झाला. त्याच्या अगोदर आठ दिवसांपासून जेवण केल्यानंतर पोट दुखत होते आणि उलटी होत होती. झोपही नीट लागत नव्हती. परंतु त्या दिवशी

काहीच त्रास झाला नाही म्हणून आम्हा सर्वांचा भगवंतावर विश्वास बसला.

एकदा बाबांचा दौरा मंगरली या गावी होता. बाबा, आई आणि मी असे आम्ही ३५ सेवक दौऱ्यात होतो. सेवकांनी बाबांना वनभोजनाकरिता मोगरकशा तलावाजवळ चलण्याची विनंती केली. बाबांनी ती मान्य केली. दुपारी १२ वाजता आम्ही तळ्यावर पोहचलो. सामान उतरवून आंघोळीकरिता तलावावर गेलो. बाबांची आंघोळ झाली आणि ते परतले, जाते वेळी त्यांनी सांगितले की आपण सर्व लवकर परत या. त्या तलावातच एक जोड डोंगा होता. तलावात सुमारे २-३ हत्ती पाणी होते. डोंग्यावर पहिल्यांदा दिवाणजी बसले आणि डोंगा वाकतो हे बाबांनी पाहिले होते. म्हणून त्यांनी डोंगा बांधून ठेवण्यास सांगितले. ह्या ठिकणी आंघोळ करण्याकरिता एकच दगड होता म्हणून काही लोक डोंग्यावर आंघोळ करण्यास गेले. त्यात मी आणि चारपाच सेवक पण होते. आमची नजर चुकवून गडीरामजी डोनारकर यांचे लहान भाऊ आणि शामरावजी कार यांनी डोंगा सोडला आणि त्याला धक्का दिला. डोंगा पाण्यात शिरला. नंतर श्रीराम यांनी पाण्यात उडी घेवून डोंग्यावर चढण्याचा प्रयत्न केला. परंतु डोंगा डोलू लागला. डोंग्यामध्ये दोन्हीकडून पाणी भरु लागले. मला पोहता येत नव्हते. म्हणून मी भगवंताचे स्मरण करीत उभा होतो. त्याच वेळी सर्वांनी डोंगा बुडाला असा एकच कल्लोळ केला. उलट दिशेने आवाज आला की डोंगा बुडणार नाही. तो आवाज चंद्रकलाबाई क्षीरसागर ह्यांचा होता. कारण तेथे बाबा होते. बाबांच्या चपला तलावावर राहिल्या म्हणून बाबा परत तलावाजवळ आले होते. बाबांनी तलावाकडे नजर टाकली तेव्हा गोपीचंदजी तुपट पाण्यात बुचकाळी खात होते. बाकी सर्व पोहत निघाले. गोपीचंद सेलकी सेवकाचे धोतर धरुन काठावर आले. बाबांनी एका सेवकास पोहत जाऊन डोंग्याची दोरी धरुन ओढत आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे डोंगा ओढून आणला व बांधून ठेवला. भगवंताच्या कृपेने डोंगा पाण्यात बुडाला नाही. भगवंताने आणि बाबा जुमदेवजींनी आम्हाला या संकटातून वाचविले.

साध्या अगरबत्तीने कार्य आटोपल्यानंतर त्यागाचे ११, २१ आणि नंतर ४२ दिवस केले. ह्यात मला पूर्ण समाधान मिळाले. व्यवहारातसुध्दा समाधान मिळाले तसेच मुलालासुध्दा पुत्रप्राप्तीचा योग प्राप्त झाला व माझ्या पोटाचा त्रास पूर्णपणे दूर झाला. आता आम्ही पूर्ण सुख व समाधान प्राप्त करीत आहोत.

* * * * *